# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२६/२०२६ मधील नि.क्र.१ खालील आदेश

## श्रीपाद वि. शासन

## CNR No.MHLA060003862026

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार नामे **श्रीपाद पि. विनायकराव कुलकर्णी** यांनी बी.एन.एस.एस. चे कलम ५०३ प्रमाणे गुन्हयात जप्त मोटार सायकलचा अंतरीम ताबा मिळणेकामी दाखल केला आहे.

२. अर्जातील मजकूर असा की, किनगाव पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.नं.००१९/२०२६ बी.एन.एस. चे कलम ३०३ (२) अन्वये दाखल गुन्हयामध्ये अर्जदार यांच्या मालकीची TVS REDAON ही खालील वर्णनाची दोनचाकी गाडी जप्त करण्यात आलेली आहे तिचे वर्णन पुढीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| रजिस्ट्रेशन नंबर | :- | एमएच-२४ बीजे ४२८२ |
| चेसिस नंबर | :- | MD625BK27L1H02301 |
| इंजिन नंबर | :- | BK2HL1005578 |

सदर वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असून त्यांना त्याची दैनंदिन वापरासाठी नितांत गरज असते. जप्त मोटारसायकल पोलीस स्टेशन उघडया अवस्थेत आहे. जर मोटारसायकल पोलीस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास मोटारसायकलचे पार्ट होऊन अर्जदाराचे मोठे नुकसान होईल, ज्याची भरपाई पैशाच्या स्वरूपात मिळणे शक्य होणार नाही. सबब, त्यांनी मोटारसायकलचा अंतरीम ताबा मिळण्याची विनंती केली आहे.

३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी अर्जास हरकत घेतलेली असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सदर मोटारसायकल ही पोलीसांनी तपासादरम्यान जप्त केलेली आहे. त्यामुळे ती सुनावणीदरम्यान तो एक आवश्यक पुरावा आहे. जर मोटारसायकल अर्जदारास परत केली तर तिची विल्हेवाट लावण्याची शक्यता आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. तपासी अंमलदार यांनी नि.६ खाली म्हणणे दिले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे न्यायालयाच्या योग्य त्या अटी नमुद करुन वाहन अर्जदारास परत करण्यास त्यांची हरकत नसल्याचे सांगितले आहे.

५. अर्जदाराने अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र, आर.सी. बुकची छायांकित प्रत, आधारकार्डची छायांकीत प्रत व प्रथम खबर अहवालाची छायांकीत प्रत अशी कागदपत्रे दाखल

केली आहेत. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सदर वाहन क्र. एमएच–२४ बीजे ४२८२ चा मालक असल्याचे स्पष्ट होते. गुन्हयाचे स्वरुप पाहता वाहनाचा ताबा संपरिक्षेदरम्यान अर्जदाराकडे दिल्यास त्याचा परिणाम संपरिक्षेवर होण्याची शक्यता दिसत नाही.

**६.** सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये ठेवून त्याचे नुकसान होणार आहे. सदर वाहनाचा मालक असलेबाबत अर्जदाराने योग्य तो पुरावा दिला आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज काही शर्तीवर व अटींवर मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना किनगाव पोलीसांनी गु.र.नं.००१९/२०२६ अन्वये बी.एन.एस. चे कलम ३०३ (२) अन्वये जप्त TVS REDAON दोनचाकी वाहन ज्याचा रजिस्ट्रेशन नंबर एमएच–२४ बीजे ४२८२ असा आहे. त्याचा अंतरीम ताबा खालील शर्ती व अटींच्या अधीन राहून देण्यात यावा.

३. अर्जदार यांनी रक्कम रुपये ८०,०००/– (रुपये ऐंशी हजार फक्त) चा निरीक्षणग्रह बंधपत्र सादर करावे. अर्जदार यांनी सदर वाहनाचे मूळ स्वरुप, रंग बदलू नये अथवा वाहन इतर कोणासही हस्तांतरीत अथवा तबदिली करु नये तसेच या न्यायालयात आवश्यकता वाटल्यास न्यायालयाचे आदेशान्वये जप्त वाहन न्यायालयात हजर ठेवावे.

४. अर्जदार या न्यायालयाने अथवा या न्यायालयाच्या वरिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्देशावरुन उपरोक्त नमुद वाहन हजर करण्यास असमर्थ ठरल्यास रक्कम रुपये ८०,०००/– (रुपये ऐंशी हजार फक्त) या न्यायालयात हजर ठेवावे.

५. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदाराच्या ताब्यात देतेवेळी अर्जदाराच्या खर्चाचे सदर जप्त वाहनाचे फोटो काढावे, फोटोवर अर्जदाराची स्वाक्षरी घ्यावी व पंचनामा करावा. सदर पंचनामा व फोटो न्यायालयात दाखल करावे.

६. येणेप्रमाणे यादी देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.03.30 11:14:40 +0530

दिनांक : – २७.०३.२०२६.

**(श्रीमती एस.डी. वडगांवकर)**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अहमदपूर.
(कोर्ट क्र.०१)